महाराष्ट्र शासन

**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ( DIET )**

सर्व्हे नं. ४६, हिस्सा नं. २९, काजरघाटी धार, मौजे कुवारबांव, ता. जि. रत्नागिरी

दूरध्वनी : ०२३५२ - २२८५७५ / ३५ Email : dietrtn@gmail.com / dietratnagiri@maa.ac.in

विषय : **प्रवास वर्णन लेखन स्पर्धा नियमावली**

१. प्रवास वर्णन लेखन स्पर्धा तालुकास्तर ते राज्यस्तरावर आयोजित करण्यात आली आहे.

२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन अंतर्गत कार्यरत असणाऱ्या नियमित अधिकारी, कर्मचारी शिक्षक यांना सदर स्पर्धेत सहभागी होता येईल.

३. लेखनाची शब्द मर्यादा १२०० ते १५०० इतकी असावी.

४. प्रवास वर्णन लेखन हे MS Word File मध्ये युनिकोड Font मराठी मध्ये टाईप करून त्याची PDF तयार करून त्याची Soft व Hard कॉपी स्वरुपात संबंधित तालुक्याकडे सादर करावी.

५. प्रवास वर्णन हे पर्यटनाच्या विशिष्ट हेतूने केलेले असावे व त्यावर वस्तुनिष्ठ लेखन करावे.

६. प्रवास वर्णन हे उत्कंठा वाढविणारे, अस्सल अनुभव असलेले व क्रमबद्ध असावे.

७. प्रवास वर्णन सांस्कृतिक, पारंपरिक, सामाजिक व साहित्यिक मूल्य जोपासणार असावे.

८. प्रवास वर्णन साध्या सोप्या भाषेत असावे.

९. प्रवास वर्णन लेखन सूक्ष्म निरीक्षणातून आवश्यक तेथे छायाचित्रांचा उपयोग केला तरी चालेल.

१०. प्रवास वर्णन लेखन हे सर्जनशील व वाचकाला पर्यटनासाठी उद्युक्त करणारे असावे.

११. लेखनात संस्मरणीय प्रसंगाची नोंद असावी.

१२. वादग्रस्त / आक्षेपार्ह मजकूर टाळून प्रवास वर्णन लेखन हे स्वनिर्मित असावे.

१३. एका स्पर्धकाचे एकच प्रवास वर्णन स्पर्धेसाठी स्वीकारले जाईल.

१४. प्रवास वर्णन करणाऱ्या लेखकांना त्यांनी केलेल्या लेखनाचे सर्व हक्क परिषदेच्या स्वाधीन केल्याबद्दलचे शपथपत्र देणे बंधनकारक असून लिहिलेला मजकूर कॉपीराईट मुक्त असल्याचे शपथपत्र द्यावे लागेल.

Govt. of Maha. Dist. Inst. of Edu. & Trg. Ratnagiri

( नीता कांबळे )

प्राचार्य

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रत्नागिरी